MHKO180007552022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२७०/२०२२**

नि. ८/ सी लगत.

महाराष्ट्र सरकार वि. महादेव देवगोंडा कुडचे वगैरे १.

**न्या य नि र्ण य**

( घोषित दिनांक : २० एप्रिल, २०२३ )

आरोपींची प्रस्तुत खटल्याव्दारे मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) नुसार संपरीक्षा घेण्यात आली. आरोपी विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नि.क्र.८ वर नोंदविण्यात आला व त्याचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

२. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता सौ.वर्षा पाराज–पाटील व आरोपी तर्फे वकील सौ.एस.पी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. सादर पुराव्यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ घेतले व त्यावरील माझे निष्कर्ष पुढील कारणमीमांसेद्वारे देत आहे:–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि.०९/०८/२०२२ रोजी शिरदवाड गावचे हद्दीत पंचगंगा नदी पुलाचे जवळ पानपट्टीचे आडोश्याला आडोश्यास उघडयावर आरोपी हे स्वतःचे फायदयाकरीता लोकांचेकडून पैसे घेवून व त्यांना कल्याण मटक्याच्या चिठ्ठया देवून कल्याण मटका नांवाचा जुगार खेळत असताना मिळून आला ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ व २ करीता</u> :-

३. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या हेतूने सा.क्र.१ विशाल धोंडीराम शिंदे व तपासी अंमलदार सा.क्र.२ जी.पी.प्रधान यांना पुराव्याचे कामी तपासलेले आहे.

४. सा.क्र.१ विशाल धोंडीराम शिंदे यास जप्ती व घटनास्थळ पंचनामा शाबीत करण्याच्या दृष्टीकोनातून पुराव्यादाखल तपासले आहे. परंतु त्याने अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही कथन त्याच्या पुराव्यात केलेले नाही. त्यामुळे त्याचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

५. सा.क्र.२ जी.पी.प्रधान यांचे जबाबात असे आले आहे की, दि.०९.०८.२०२२ रोजी मी कुरुंदवाड पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत असताना दि.०१.०९.२०२२ रोजी सहा.पो.निरीक्षक कुरुंदवाड पो.स्टेशन यांचे आदेशाने ते त्यांच्या स्टाफसह दोन पंचाना सोबत घेवुन दत्तवाड गावी सदलगा रोडचे कडेला पोहाचलो. तेथे एक इसम लोकांच्याकडून पैसे घेवुन कल्याण नांवाचा जुगार कल्याण मटका चालवित असल्याचे समजले. त्याठिकाणी छापा टाकला असता त्यांना एक इसम काहीतरी लिहीत असलेला दिसून आला. त्यावेळी त्याचेकडून रक्कम रु.३३८०/-, मटक्याच्या चिठ्ठया, एक निळया शाईचा बॉलपेन असा मुद्देमाल मिळून आला. पो.ना.हंकारे यांनी दोन पंचासमक्ष पंचनामा केला. त्यानंतर आरोपींना पोलीस स्टेशनला आणण्यात आले व त्यांनी गु.र.नं.२०१/२०२२ ने सरकारतर्फे फिर्याद दिली.

७. श्री.जी.पी.प्रधान सा.क्र.२ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यांनी केवळ पोलीस साक्षीदारांचे जबाब नोंदविल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असून देखील घटनास्थळाच्या परिसरातील स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर नाही. त्याचे कारण देखील तपासी अधिकारी जी.पी.प्रधान यांनी पुराव्यात कथन केलेले नाही. त्यामुळे आरोप सिध्द

होणेकरीता स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर नसल्यामुळे दोषारोप सिध्द होत नाही. म्हणून मुद्दा क्र.१ याचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो व मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो :–

## आदेश

१. आरोपीची मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम १८८८ चे कलम १२–अ अन्वये दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक व जमानतदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. प्रकरणातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये ३३८०/– अपील कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावीत.

४. जप्त मुद्देमाल कल्याण मटक्याच्या चिठ्ठया व एक निळया शाईचा बॉलपेन मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करणेत यावा.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम ₹१५,०००/– चे जामीन पत्र व बंधपत्र देणेचे आहे. सदर जामीन सहा महिन्याचे कालावधीनंतर रद्द समजणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

Digitally signed by Atul Arun Kulkarni
Date: 2023.04.29 11:08:45 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

दिनांक – २० एप्रिल, २०२३

(अ.अ.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरुंदवाड.